



# जनमत
## सर्वसामान्यांचे



e-mail - dainikjanmat@gmail.com


### श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी चा अनोखा उपक्रम

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक अध्ययनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड

उमरगा, दि. ३ (प्रतिनिधी) - देशात आणि जगात थैमान घातलेल्या कोरोना या रोगाच्या महामारी मुळे शासनाने १६ मार्च ते १४ एप्रिल पर्यंत सर्व शैक्षणिक संस्थेचे कामकाज थांबवण्याचा निर्णय घेतला. तसेच शासनाने शैक्षणिक संस्थांना आणी शिक्षकांना ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सुरू ठेवण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने उमरगा येथील श्रम जीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी येथील शिक्षकांनी वर्क फ्रॉम होम द्वारे व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून गुगल सर्च इंजिन चा वापर करून ऑनलाइन गुगल क्लासरूम च्या माध्यमातुन डी. फार्मसी व बी. फार्मसी च्या विद्यार्थ्यांना घर बसल्या शैक्षणिक अध्यनासाठी मदत करीत आहेत.

शिक्षकांना विषय निहाय ऑडीओ आणि व्हिडिओ प्रेझेन्टेशन या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. विषय निहाय आढावा घेण्यासाठी ऑनलाईन तास आणि गृहपाठ इत्यादींचा वापर करून विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या परीक्षेची तयारी करून घेत आहेत.

गुगल क्लासरूम, युट्युब आणि इतर उपलब्ध असलेल्या ऑनलाईन सर्च इंजिन चा वापर करून ई बुक, पिडीएफ, नोट्स इत्यादि ऑनलाईन साधनांचा वापर करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा उर्वरित अभ्यासक्र पूर्ण करून घेत आहेत.

कोरोना या रोगाच्या प्रादुर्भ रोखण्यासाठी शासनाक वेळोवेळी मिळणाऱ्या सूचन पालन अत्यंत कटिबद्ध पध्दत विद्यार्थी आणि शिक्षकांनी कर असे आवाहन महाविद्यालय प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर व केले. या अनोख्या उपक्रमास आदर्श महाविद्यालयाचे प्रा डॉ. दिलीप गरुड यांनी शुभेच्छ दिल्या.

सकाळ

औरंगाबाद, गुरुवार, २४ जून २०२१



# औषध निर्माता नोंदणी परवान्यास मान्यता

## उमरगा ; कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे यश

उमरगा, ता. २३ (बातमीदार) : येथील श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयास दिल्ली येथील फॉर्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी औषध निर्माता नोंदणी परवान्यास मान्यता दिली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना औषध निर्मितीचे शिक्षण मिळावे, औषध निर्मिती क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगाराची व आधुनिक अभ्यासक्रमाद्वारे औषध निर्मिती करता यावी, यासाठी श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनायकराव पाटील, सरचिटणीस तथा माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, सचिव रामकृष्णपंत खरोसेकर व संचालक यांच्या प्रयत्नातून श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी सुरू करण्यात आले. येथे डिप्लोमा आणि पदवीच्या अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात आला आहे.

महाविद्यालयाची गुणवत्ता पडताळून महाविद्यालयास दिल्ली येथील फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या वतीने फार्मसीचा डिप्लोमा पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना औषधी निर्मिती व्यावसायात आवश्यक असलेला औषध निर्मिती नोंदणी परवाना उपलब्ध करून देण्याची परवानगी दिली आहे. या परवानगीमुळे आता श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये औषध निर्मितीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय, निमशासकीय क्षेत्रात नोकरीची संधी प्राप्त होण्यास मदत मिळणार आहे. प्राचार्य डॉ. श्रीराम पेटकर, उपप्राचार्या ज्योती आरसुडे (पेटकर), प्रा. रंगनाथ चव्हाण, प्रा. रोहित बाबशेट्टी, प्रा. नेहा चव्हाण, प्रा. पूजा कोरके, प्रा. चनबस शेटगार, प्रा. आकाश पाटील, प्रा. श्वेता कलबुर्गी, प्रा. सोनाली रसाळ, प्रा. स्वप्नाली चौधरी, प्रा. सोनाली रसाळ आदींनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी पुढाकार घेतला आहे.

12:09 PM
Wondershare FilmoraGo
1/1

पुरोगामी विचाराचे
एकमत

## टी-ट्वेंटी वर्ल्डकप, संघ जाहीर



# श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मशीचा शंभर टक्के निकाल




**उमरगा** : येथील श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षण विभाग व लोणारे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या वार्षिक परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. श्रमजीवी कॉलेज फार्मसीच्या पदविका आणि पदवीचा शंभर टक्के निकाल लागला आहे.

या परीक्षेत डिफार्मसीच्या प्रथम वर्गासाठी ६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम वर्षाच्या परीक्षेत अनुराधा गोटे हिने ८७.३६ टक्के गुण घेऊन प्रथम, पुजा दापे गावे हिने ८६.५५ टक्के गुण द्वितीय, फकीर हिना ८५.९ टक्के तृतीय आली आहे. डिफार्मसी द्वितीय वर्षातील राम शेजाळ याने ९०.९० टक्के गुण घेऊन प्रथम, मनीषा सुर्यवंशी हिला ८८.८ टक्के द्वितीय, सजा मुल्ला ८८.१० टक्के तृतीय क्रमांकाचे यश संपादन केले आहे. द्वितीय वर्षा करिता ६२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने द्वितीय वर्षाचा शंभर टक्के निकाल लागला आहे. बी. फार्मसी प्रथम वर्षा करिता ७२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ऋषिकेश गपाट याने ९४. ३४ टक्के गुण प्रथम, शंकुतला गोटे हिने ९४.३४ टक्के द्वितीय, दिपा कांबळे हिने ९२.८९ टक्के तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. द्वितीय वर्षा करीता १०२ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उमया चाकुरे हिला ९२.८० टक्के गुण प्रथम, सुकुमार गुंड हिने ९२.६० टक्के द्वितीय, करीष्मा चौहान हिने ९२.२० टक्के तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. यशाबद्दल मंडळाचे अध्यक्ष विनायकराव पाटील, सरचिटणीस तथा माजी मंत्री बसवराज पाटील, सचिव रामकृष्णपंत खरोसेकर, सर्व संचालक मंडळ प्राचार्य डॉ.दिलीप गरूड,प्राचार्य डॉ. श्रीराम पेटकर, उपप्राचार्या ज्योती आरसुडे, प्रा.रोहित बाबशेट्टी, प्रा. रंगनाथ चव्हाण, प्रा.नेहा चौव्हाण, प्रा.धनबसा कोटगार,प्रा.आकाश पाटील, प्रा.श्वेता कलबुर्गी, प्रा. सोनाली रसाळ, प्रा. स्वप्नाली चौधरी, प्रा.पुजा कोरके आदींनी कौतुक केले जात आहे.

Wondershare FilmoraGo

# श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीचा दोन्ही वर्षाचा शंभर टक्के निकाल

उमरगा/प्रतिनिधी : शहरातील श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मशीच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या तंत्रशिक्षण विभाग व लोणारे विद्यापीठ यांच्यावतीने घेण्यात आलेल्या वार्षिक परीक्षेत घवघवीत यश संपादन करत पदवी आणि पदवीकाचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ लोणेरे यांच्यावतीने घेतले असलेल्या वार्षिक परीक्षेत कॉलेज ऑफ डी फॉर्मशीच्या प्रथम वर्गासाठी ६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती त्यापैकी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम वर्षाच्या परीक्षेत अनुराधा शेटे हिने ८७.३६ टक्के गुण घेत प्रथम, पुजा दापे- गावे हिने ८६.५५ टक्के गुण घेत द्वितीय तर फाकीर हिना ८५.९ टक्के गुण घेत तृतीय आली आहे. डी फॉर्मशी द्वितीय वर्षात राम शेजाळ याने ९०.६०टक्के गुण घेत प्रथम,मनीषा सुर्यवंशी ८८.८० टक्के गुण घेत द्वितीय तर सन्ना मुल्ला हिने ८८.३० टक्के गुण घेत तृतीय क्रमांकाचे यश संपादन केले. आहे. द्वितीय वर्षा करीता ६२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते.

बीफार्मसी प्रथम वर्षासाठी ७२विद्यार्थी परीक्षेला बसले होते सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम वर्षात ऋषिकेश गपाट याने ९४.३४ टक्के गुण घेत प्रथम, शंकुतला गोटे हिने ९४.३४ टक्के गुण घेत द्वितीय व दिपा कांबळे हिने ९२.८९ टक्के गुण घेतले.

# जनमत
## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव गोरे

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

दैनिक उस्मानाबाद e-mail - dainikjanmat@gmail.com


# श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मशीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षेत घवघवीत यश



Wondershare FilmoraGo

16:42
You
34 minutes ago

लोकमत

**विद्यार्थ्यांना होतोय फायदा : श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीचा अनोखा उपक्रम**

# अध्यापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड

लोकमत न्यूज नेटवर्क

उमरगा : देशात आणि जगात थैमान घातलेल्या कोरोना या रोगाच्या महामारीमुळे शासनाने १६ मार्च ते १४ एप्रिलपर्यंत सर्व शैक्षणिक संस्थेचे कामकाज थांबविण्याचा निर्णय घेतला. तसेच शासनाने शैक्षणिक संस्थांना आणि शिक्षकांना ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सुरू ठेवण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने उमरगा येथील श्रमजिवी शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रमजिवी कॉलेज ऑफ फार्मसी येथील शिक्षकांनी 'वर्क फॉर्म होम' द्वारे व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून गुगल सर्च इंजिनचा वापर करून ऑनलाइन गुगल क्लासरूमच्या माध्यमातून डी.



फार्मसी व बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांना घर बसल्या शैक्षणिक अध्यापनासाठी मदत करीत आहेत.

शिक्षकांना विषय निहाय ऑडिओ आणि व्हिडिओ प्रेझेन्टेशन या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. विषयनिहाय आढावा घेण्यासाठी ऑनलाईन तास आणि गृहपाठ इत्यादीचा वापर करून विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या परीक्षेची तयारी करून घेत आहेत. गुगल क्लासरूम, युट्युब आणि इतर उपलब्ध असलेल्या ऑनलाईन सर्च इंजिनचा वापर करून ई-बुक, पिडीएफ, नोट्स इत्यादी ऑनलाईन साधनांचा वापर करून शिक्षक विद्यार्थ्यांचा उर्वरित अभ्यासक्रम पूर्ण करून घेत आहेत. कोरोना या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी मिळणाऱ्या सूचनांचे पालन अत्यंत कटिबद्ध पध्दतीने विद्यार्थी आणि शिक्षकांनी करावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर यांनी केले.

या अनोख्या उपक्रमाबद्दल संस्थेचे सरचिटणीस व राज्याचे माजी मंत्री बसवराज पाटील, संस्थेचे अध्यक्ष विनायकराव पाटील, सचिव रामकृष्णपंत खरोसेकर यांनी कौतुक केले. सदरील ऑनलाईन शिक्षणाच्या उपक्रमासाठी आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी मार्गदर्शन केले.

Hello Osmanabad
Page No. 2 Apr 04, 2020
Powered by: erelego.com

Wondershare FilmoraGo

16:42

You
34 minutes ago

# श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुविधा पुरविणार:बसवराज पाटील

उमरगा – समय सारथी

सद्या सर्वत्र कोरोना या संसर्गजन्य आजारा मुळे संपुर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढतच आहे. विशेष दक्षता घेणे हाच या वरील उपाय आहे.कोरोनाच्या संकटात शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या करीता श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध विद्या शाखांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यां करीता श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मार्फत विद्यार्थ्यांच्या घराघरापर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाची सुविधा पुरविण्यात येणार असल्याची माहीती श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस तथा माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यानी संस्थेच्या वतीने आयोजित बैठकित दिली आहे.गेल्या दोन महिन्यापासून कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसें दिवस मोठया प्रमाणात वाढत आहे. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये. गुरूवारी सायंकाळी सोशल डिस्टशिंगचे पालन करून संस्थेचे सरचिटणीस बसवराजजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष





विनायकराव पाटील,चिटणीस रामकृष्णपंत खरोसेकर, संचालक मल्लीनाथ दंडगे, अँड. व्ही.एस. आळंगे, प्राचार्य डॉ. दिलीप गरूड, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर, प्राचार्य डॉ.मन्मथ माळी, प्राचार्य डॉ.विजय सरपे, प्राचार्य भिमाशंकर सारणे, मुख्याध्यापक धनाजी खोंडे, व्यंकट घोडके,शिवराज औसेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी आयोजित बैठकीत बसवराजजी पाटील बोलत होते.कोरोनाच्या संकटाने संपूर्ण जगात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली आहे. या संकटावर मात करण्याची गरज निर्माण झाली आहे. शासनाच्या वतीने वेळोवेळी घालून दिलेल्या नियमांचे पालन करा. सामाजिक अंतर ठेवा, अनावश्यक घरा बाहेर फिरू नका, आपली व आपल्या कुटूंबियांची काळजी घ्या, असे अवाहन पाटील यांनी केले. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जपण्यासाठी श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या घराघरापर्यंत ऑनलाईन शिक्षण सुविधांची पुर्तता करा. शिक्षणाशिवाय जगता येणं शक्य नसल्यामुळे संकटावर मात करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जपण्यासाठी त्यांच्या घरा पर्यंत शैक्षणिक सुविधा पोंहच करा. विद्यार्थी हेच शिक्षण संस्थांचे दैवत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आरोग्याची दक्षता घ्या. विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची आपुलकीने विचार पुस करा.आदर्श वरिष्ठ कनिष्ठ महाविद्यालय, श्रमजीवी अध्यापक विद्यालय महाविद्यालय, आदर्श प्राथमिक विद्यालय, रायजिंग सन इंग्लीश स्कूल, श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी या विविध विद्या शाखांच्या वतीने शैक्षणिक अभ्यासक्रमावर आधारीत प्रत्येक विद्याशाखांचे स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित करून सोशल मेडिया , यू ट्यूब , ईमेल , वॉटसअप , कंम्प्यूटर , लॅपटॉप या विविध माध्यमा मार्फत विद्यार्थ्यांना ऑन शैक्षणिक माहीती उपलब्ध करून देण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला. विविध विद्या शाखेत प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यां करीता ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले. विविध विद्या शाखेतील विद्यार्थ्यांना ऑन लाईन जोडण्याच्या सुचना यावेळी बसवराजजी पाटील यांनी विविध विद्या शाखांच्या प्रमुखांना दिल्या. यावेळी विविध विद्याशाखांच्या वतीने ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया, अभ्यासक्रम नियोजन, सोशल मिडीयाचा वापराबाबत केलेल्या तयारीची माहीती या बैठकीत विविध विद्या शाखांच्या प्रमुखांनी सादर केली.

Wondershare
FilmoraGo

# औषध निर्माता नोंदणी परवान्यास मान्यता

## उमरगा ; कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे यश

**उमरगा, ता. २३ (बातमीदार)** : येथील श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयास दिल्ली येथील फॉर्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी औषध निर्माता नोंदणी परवान्यास मान्यता दिली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना औषध निर्मितीचे शिक्षण मिळावे, औषध निर्मिती क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगाराची व आधुनिक अभ्यासक्रमाद्वारे औषध निर्मिती करता यावी, यासाठी श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनायकराव पाटील, सरचिटणीस तथा माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, सचिव रामकृष्णपंत खरोसेकर व संचालक यांच्या प्रयत्नातून श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी सुरू करण्यात आले. येथे डिप्लोमा आणि पदवीच्या अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात आला आहे.

महाविद्यालयाची गुणवत्ता पडताळून महाविद्यालयास दिल्ली येथील फार्मली कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या वतीने फार्मसीचा डिप्लोमा पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना औषधी निर्मिती व्यावसायात आवश्यक असलेला औषध निर्मिती नोंदणी परवाना उपलब्ध करून देण्याची परवानगी दिली आहे. या परवानगीमुळे आता श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये औषध निर्मितीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय, निमशासकीय क्षेत्रात नोकरीची संधी प्राप्त होण्यास मदत मिळणार आहे. प्राचार्य डॉ. श्रीराम पेटकर, उपप्राचार्या ज्योती आरसुडे (पेटकर), प्रा. रंगनाथ चव्हाण, प्रा. रोहित बाबशेट्टी, प्रा. नेहा चव्हाण, प्रा. पूजा कोरके, प्रा. चनबस शेटगार, प्रा. आकाश पाटील, प्रा. श्वेता कलबुर्गी, प्रा. सोनाली रसाळ, प्रा. स्वप्नाली चौधरी, प्रा. सोनाली रसाळ आदींनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी पुढाकार घेतला आहे.

Wondershare Filmora

सकाळ

# श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीचा शंभर टक्के निकाल

**उमरगा, ता. १० (बातमीदार)** : येथील श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या तंत्रशिक्षण विभाग व लोणारे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या वार्षिक परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. श्रमजीवी कॉलेज फार्मसीच्या पदविका आणि पदविचा शंभर टक्के निकाल लागला आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ लोणेरे यांच्या वतीने नुकत्याच उन्हाळी वार्षिक परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेत डी. फार्मसीच्या प्रथम वर्गासाठी ६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यात सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

प्रथम वर्षाच्या परीक्षेत अनुराधा शेटे हिने ८७. ३६ टक्के गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम आली. पूजा दापेगावे ८६.५५ टक्के गुण प्राप्त करून द्वितीय, तर फाकीर हिना ८५.९ टक्के गुण घेऊन महाविद्यालयात तृतीय आली. डी. फार्मसी द्वितीय वर्षातील राम शेजाळ याने ९०.६० टक्के गुण घेऊन प्रथम, मनीषा सूर्यवंशी हिला (८८.८० टक्के) द्वितीय तर सना मुल्ला (८८.३० टक्के) हिने तृतीय क्रमांक मिळविला. बी. फार्मसी प्रथम वर्षातील सर्वच ७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम वर्षातील ऋषिकेश गपाट याने ९४. ३४ टक्के गुण प्राप्त करून प्रथम, शंकुतला गोटे हिने (९४.३४ टक्के) द्वितीय तर दीपा कांबळे हिने ९२.८९ टक्के गुण प्राप्त करून महाविद्यालयात तृतीय क्रमांक मिळविला. द्वितीय वर्षातील १०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात उजमा चाकुरे हिला ९२.८० टक्के गुण मिळाल्याने ती प्रथम आली. सुकुमार गुंड हिने ९२.६० टक्के गुण घेऊन द्वितीय तर करिष्मा चौहान हिने ९२.२० टक्के गुण घेऊन महाविद्यालयात तृतीय क्रमांक मिळविला.

श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनायकराव पाटील, सरचिटणीस तथा माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, सचिव रामकृष्णपंत खरोसेकर, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य डॉ. श्रीराम पेटकर, उपप्राचार्या ज्योती आरसुडे, प्रा. रोहित बाबशेट्टी, प्रा. रंगनाथ चव्हाण आदींनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

Aurangabad, Osmanabad-Today
11/09/2021 Page No. 3

Wondershare FilmoraGo

सकाळ

# रक्तदान शिबिराचा उपक्रम महत्त्वाचा : पतंगे

## राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त रक्तदान शिबिर



Wondershare FilmoraGo

# उमरगा येथे मानसिक संतुलन व ध्यानधारणा शिबिर संपन्न

उमरगा – समय सारथी

सध्याचे युग हे भौतिक सुखाकडे वाटचाल करणारे युग आहे. या गतिमान जमान्यात बालकापासून ते वृद्धापर्यंत सर्वांनाच ताण तणावाचे जीवन जगावे लागत आहे. ताण तणाव कमी करण्यासाठी व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी मनावर नियंत्रण ठेवा. तणाव मुक्तिसाठी दैनंदिन जीवनात सकारात्मक विचारांची पेरणी करा असे प्रतिपादन उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिता राठोड यांनी केले. उमरगा शहरातील श्रमजिवी कॉलेज ऑफ फार्मसी च्या वतीने मानसिक संतुलन व ध्यानधारणा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. अनिता राठोड बोलत होत्या. अध्यक्षस्थानी



प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर यावेळी उपप्राचार्या ज्योती आरसुडे, प्रा. रोहित बाबशेट्टी प्रा. चव्हाण रंगनाथ प्रा. शेटगार चनबस, प्रा.चव्हाण नेहा इत्यादी उपस्थित होते. मानवी मन आणि मानवी शरीर ही मानवाला मिळालेली नैसर्गिक देणगी आहे. या देणगीचा उपयोग जगण्याच्या रंगमंचावर परमेश्वराने दिलेली सप्रेम भेट असा करा असे सांगताना डॉ. अनिता राठोड पुढे म्हणाले की आजच्या गतिमान व संवेदनशील जमान्यात ताण तणाव ही प्रमुख समस्या होऊन बसली आहे.ताण तणावावर मनाचे संतुलन हा एकमेव उपाय आहे. कोणत्याही समस्येला व संकटाला सामोरे जाताना सकारात्मक मानसिकतेतून पुढे जाऊन ताण तणाव विरहीत जीवन जगा. मनाची चंचलता व संवेदनशीलता ही मानवी आरोग्याला लाभलेली देणगी आहे. याचा उपयोग नेहमीसाठी आपल्या सकारात्मक मानसिक दृष्टीने करावा. कोणाचे वाईट विचार कधीच मनात आणू नये. सुप्रद मन हे सुप्रद शरीरात निर्माण होत असल्याने प्रारंभी आपले मन सुदृढ ठेवून आरोग्य सुदृढ ठेवावे. ध्यानधारणा, योग्य व्यायाम, विविध व्यसनापासून दुरावा याचा स्वीकार करा असे डॉ. राठोड म्हणाल्या. यावेळी डॉ. भीमाशंकर पाटील यांनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व योग प्राणायामाची प्रात्यक्षिक करून दाखवले.अध्यक्षीय समारोप डॉ. श्रीराम पेठकर यांनी केला, त्यावेळी ते म्हणाले की राग हा क्षणिक असतो रागाला वेळीच आवरा व मनाचे संतुलन हीच आरोग्याची संपत्ती आहे. चुका करून पश्चाताप करण्यापेक्षा चुका होणार नाहीत याची दक्षता घ्या. ज्ञान आणि ध्यान याचा संगम आयुष्य परिपूर्ण करते.ध्यानधारणा केल्याने वैश्विक चेतनेचा अनुभव, भावनिक स्थिरता, समस्त सृष्टीची सुसंगती आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी नियमितपणे ध्यानधारणा करा असे डॉ. श्रीराम पेठकर म्हणाले.

Wondershare FilmoraGo

16:42
You
34 minutes ago

# जनमत
## सर्वसामान्यांचे

दैनिक उस्मानाबाद e-mail - dainikjanmat@gmail.com



# श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाची सुविधा

## सरचिटणीस बसवराज पाटील यानी दिली माहीती



Wondershare FilmoraGo

उमरगा, उस्मानाबादेत रॅली : मोरे महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी घेतली प्रतिज्ञा, रक्तगट तपासणी शिबीर

# औषध निर्माता दिनानिमित्त विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

उस्मानाबाद : जागतिक औषध निर्माता दिनानिमित्त जिल्ह्यात औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय तसेच औषध विक्रेत्यांच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. [illegible]

**केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन**

उस्मानाबाद : जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने [illegible]

[illegible]



उमरगा येथील श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये आयोजित पोस्टर प्रदर्शन पाहताना विद्यार्थी.

[illegible]

**के. टी. पाटील फार्मसी**

उस्मानाबाद : येथील के. पाटील औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयात [illegible]

[illegible]

**पोस्टरद्वारे जनजागृती**

[illegible]

## 'श्रमजीवी'मध्ये पोस्टर प्रदर्शन

- उमरगा : येथील श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने पोस्टर प्रदर्शनाचे [illegible]
- [illegible]
- [illegible]

# श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने सूक्ष्मजीवांची औषधनिर्माण शास्त्रासाठी उपयोगिता



उमरगा – समय सारथी

आरोग्य ही निसर्गाने मानवाला दिलेली महान देणगी आहे. या देणगीचा मानवाने जीवनात जगण्यासाठी काटेकोरपणे व परिपूर्ण उपयोग करून घेण्याची जबाबदारी मानवासह प्रत्येक सजीवाची आहे. औषधोपचार व आजार हे चिरनिरंतर आहेत. कुठल्याही आजाराला कायम पायबंद नाही. आजारावर मात करण्यासाठी सर्व जण औषधांचा वापर करून पुन्हा आजाराला हद्दपार करत. आजच्या गतिमान जगात होणाऱ्या विविध आजारावर औषधोपचार करण्यासाठी व मानवी आरोग्य सुदृढ ठेवण्याची जबाबदारी आता औषधनिर्माणशास्त्राकडे पाहली आहे. सामाजिक व मानवी आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी औषधनिर्माणशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी दर्जेदार औषध निर्माण करून निरोगी व सुदृढ समाज घडवावा असे आवाहन भारतीय सूक्ष्मजीव शास्त्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश देशमुख यांनी केले.

उमरगा येथे श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी च्या वतीने सूक्ष्मजीवांची औषधनिर्माण शास्त्रासाठी उपयोगिता या विषयावर आयोजित कार्यक्रमात प्रसंगी डॉ. अविनाश देशमुख बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर होते. या वेळी आदर्श महाविद्यालयाचे सूक्ष्मशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सतीश माळी, डॉ. शंकर दुर्गे, उपप्राचार्य ज्योती अप्तुडे, प्रा. ... , प्रा. ... पाटील, प्रा. ... यांची प्रमुख उपस्थिती होती.

आजार बरे व आजार निर्माण करणारे असंख्य सूक्ष्मजीव आहेत. या सूक्ष्मजीवांचा आधुनिक पद्धतीने संशोधन करण्याची आवश्यकता औषधनिर्माणशास्त्राची आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे दिवसेंदिवस वाढत्या प्रदूषणामुळे व बदलत्या हवामानामुळे आजाराच्या प्रमाणात मोठी वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. सांसर्गिक आजार, आरोग्य संवर्धनाची निष्काळजी, बदलती जीवनशैली, संयम आहाराची कमतरता या विविध कारणांमुळे विविध आजार डोकावू लागले आहेत. या विविध आजाराला आळा घालण्यासाठी प्रतिजैविकांचे प्रमाण संशोधन करण्याची गरज निर्माण झाली आहे. आधुनिक माहिती आणि तंत्रज्ञानाच्या जमान्यातील औषधनिर्माणशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी मानवी आरोग्य सुदृढ राखण्यासाठी दर्जेदार औषधांची निर्मिती करावी असे प्रतिपादन डॉ. देशमुख यांनी केले.

यावेळी प्रा. डॉ. सतीश माळी यांनी रोग निदान व रोग उपचार या मानवी आरोग्याच्या [illegible] सूक्ष्मजीवांचा शोध घेऊन आधुनिक संशोधनाला सामोरे जावे असे म्हणाले.

प्रा. डॉ. शंकर दुर्गे यांनी निर्जंतुकीकरण हे मानवी आरोग्याची गुरुकिल्ली आहे. सामाजिक जीवनात व परिसर निर्जंतुकीकरण करून आपले आरोग्य अबाधित ठेवा असा संदेश दिला.

यावेळी अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर यांनी आपल्याला हजारो वर्षांपूर्वी आयुर्वेदिक औषधांची परंपरा लाभलेली असून मुख्य औषधाची निर्मिती ही निसर्गातून होते व पाने, फुले, फळे, पाणी या निसर्गनिर्मित माध्यमातून संशोधन करून विविध आजार निर्माण करणाऱ्या जिवाणूंना नष्ट करण्यासाठी दर्जेदार विद्यार्थ्यांनी संशोधन करावे असे आवाहन केले.

Wondershare FilmoraGo